दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक १६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.१७ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# कोल्हापूर पोटनिवडणूक ; काँग्रेसच्या जयश्री जाधव यांचा दणदणीत विजय

**कोल्हापूर : वृत्तसंस्था**

कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीचा अंतिम निकाल हाती आला असून काँग्रेसच्या जयश्री जाधव यांनी दणदणीत विजय मिळवला तर भाजपच्या सत्यजित कदम यांचा दारुण पराभव झाला. आतापर्यंत हाती आलेल्या माहितीनुसार, काँग्रेसच्या जयश्री जाधव या ९६२२६ इतक्या मतांनी विजयी झाल्यात तर भाजपच्या सत्यजित कदम यांना ७७४२६ इतकी मत मिळाली आहे. त्यामुळे भाजपसाठी हा मोठा धक्का मानावा लागणार आहे.

महाविकास आघाडी विरोधात भाजप अशा अत्यंत चुरशीच्या या निवडणुकीमध्ये काँग्रेसला गड राखण्यात यश आले आहे. आक्रमक प्रचार आणि नेत्यांची फौज मैदानात उतरवूनही विजय न मिळाल्याने भाजपसाठी हा मोठा धक्का मानला जातो. या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्यात आले होते. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या



आशीर्वादानंतर कोल्हापुरातही अंबाबाईचा आशीर्वाद मिळेल असा विश्वास विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी दाखवला होता. पण या निवडणुकीमध्ये भाजपला पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे भाजप यावर काय प्रतिक्रिया देणार हे पाहणं महत्त्वाचं आहे.

या पोटनिवडणुकीसाठी राज्य पातळीवरील नेते आणि कार्यकर्त्यांची जोरदार प्रचार फौज उतरली होती. आरोप-प्रत्यारोपांनी राजकीय वातावरण तापलं होतं. अशात पालकमंत्री सतेज पाटील आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासाठी ही निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली होती. पण आता काँग्रेस यावरून भाजपला कशाप्रकारे टार्गेट करतं हे सुद्धा आता पाहणं महत्त्वाचं आहे.

या निवडणुकांमध्ये हिंदुत्व आणि स्वाभिमान असे मुद्दे प्रचारात आले होते. काँग्रेसच्या जयश्री जाधव यांनी आपले हिंदुत्व आणि स्वाभिमान विजयी झाला, अशी प्रतिक्रिया दिली आहे. इतकंच नाही तर संपूर्ण शहरात त्यांच्या विजयाचे होर्डिंग्ज लावण्यात आले आहेत. महाविकास आघाडी भक्कम असल्याचा पुरावा देण्यासाठी आघाडीच्या नेत्यांसाठी ही निवडणूक महत्त्वाची होती. त्यामुळे ठाकरे सरकारचा हा विजय २०२४ च्या निवडणुकांसाठी देखील महत्त्वाचा असणार आहे.

# खोपोलीजवळ मुंबई -पुणे राष्ट्रीय महामार्गावर अपघात

## सुदैवाने जीवितहानी नाही, दोन्ही कारचे मोठे नुकसान



**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई - पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रं.४ वर हाळ फाटा येथे दि. १४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेच्या सुमारास एका स्विफ्ट डिझाईर कारने भरधाव वेगाने समोरील वॅगनोर कारला गतिरोधकावर आदळत पाठीमागून जोरदार धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दोन्ही कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

पुण्याहुन मुंबईकडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार (क्रमांक एम.एच.१४ - ईसी ७७६७) ने समोरील वॅगनोर कार ( क्रमांक एम.एच.४६ - बीओ २४९४) कारला स्विफ्ट डिझायर कारने गतिरोधकावर आदळून पाठीमागून जोरदार धडक दिली. स्विफ्ट डिझायर कारचा चालक व त्याच्यासोबत आणखी एक जण दारू नशेत असल्याचे समजते. स्विफ्ट कार दारूच्या नशेत कार चालवित असल्याचे प्रत्यक्षदर्शींकडून सांगण्यात आले.

खोपोली शिळफाट्याहुन हाळ बुद्रुक गाव येथील गतिरोधकावरून सुसाट वाहन हाळ फाट्यावर गोळीसारखा आला असता गतिरोधक न पाहता समोरील दुसऱ्या कारला जोरदार धडक दिली. तसेच कारमधून उतरताना



बियरची बॉटल हातात घेऊन उतरून कार खाली फेकली व पुन्हा कारमध्ये जाऊन बसला. समोर दुसरी कार नसती तर किती लोकांचे जीव घेतले असते, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या अपघाताची माहिती मिळताच खालापूर पोलिसांसह ग्रामस्थांसह अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या संघटनेच्या टीम ने घटनास्थळी धाव घेतली.

# चैत्र पौर्णिमेच्या पूर्व दिवसाला आ.प्रशांत ठाकूर आले वाकडाई दर्शनाला

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

चैत्र पौर्णिमेच्या उत्सवाला श्री वाकडाई मंदिर परिसरात पुणे येथुन भाविकांचे आगमन झाले असुन कोरोना संकटातील बंधनातुन मुक्त वातावरणात उत्सव जल्लोषात साजरा होणार. असे या उत्साही भाविकांकडे पाहताच दिसुन येत आहे. भोयी समाजाची कुलदैवत असलेली देवीची पाषाणमुर्ती फुले, गजरे, हार, तुरे, भरजरी हिरवी साडी वस्त्रालंकाराने सुशोभित करण्यात आली आहे. देवीचा नवस ओटी, खण, नारळाने, पेढे, बर्फी धुप, दिप, अक्षताने गाभारा भरला आहे. महिलांची खण नारळाने देवीची ओटी भरतानाची लगबग सुरु झाली आहे. या परिसरात मोठे उत्साहाचे वातावरण



दिसत आहे. उद्या पौर्णिमेला माणसांनी फुललेला चैत्र उत्सव उतेखोल येथे संपन्न होत असुन चैत्र पुनवेच्या पूर्व दिवसाला म्हणजेच शनिवार १७ एप्रिल रोजी रायगड किल्ला दौऱ्यावरुन परतताना लोकप्रीय आमदार प्रशांतदादा ठाकुर हे स्वतः जातीने उतेखोल येथे श्री वाकडाई देवीचे दर्शनासाठी मंदिरात आले होते.

या प्रसंगी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष अमोल मोने आणि भाजपचे

.../२

# कामोठे येथील माथेफिरुची अग्नीशमन दलाकडून सुटका


**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहत सेक्टर १७ मधील ओम शिव रेसिडन्सी या एका इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ग्रीलवर अज्ञात माथेफिरु अडकून बसल्याची घटना शुक्रवारी (दि.१५) रात्री उशिरा घडली. तब्बल तीन तासाच्या अथक प्रयत्ना नंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्तीचे प्रयत्न करुन या माथेफिरुला खाली उतरवले. या अज्ञात माथेफिरुची ओळख अद्याप पटली नाही.

कामोठे वसाहत सेक्टर १७ मधील ओम शिव रेसिडन्सी मधील इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील ग्रील वर एक अज्ञात इसम चढल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. या इसमाच्या अंगावर शर्ट नव्हते तर केवळ पॅन्ट वर हा इसम दिसून येत होता. ग्रील वर चढल्याचे पहिल्या नंतर, या सोसायटी मधील तसेच शिवसेनेच्या महिला संघटक सुलक्षणा जगदाळे यांनी या घटनेची माहिती स्थानिक कामोठे पोलीस आणि अग्निशमन दलाला दिली ही माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचले आणि या इसमाला खाली उतरविण्याचा प्रयत्न सुरू केला. मात्र त्याला खाली येता येत नव्हते व तो येण्याचा प्रयत्न देखिल करत नव्हता.

अनेक वेळा विनंती आणि त्याच्याशी संवाद साधून खाली उतरविण्याचा प्रयत्न देखील केला मात्र हा माथेफिरु खाली येण्यास तयार नव्हता.

.../२



## संक्षिप्त...

### अनिल देशमुख न्यायालयीन कोठडीत

राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांची आता न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. देशमुख यांच्या सीबीआय कोठडीत वाढ करण्यात यावी, अशी विनंती सीबीआयच्यावतीने करण्यात आली होती. मात्र, विशेष सीबीआय कोर्टाने ही विनंती फेटाळली व देशमुख यांना २९ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी दिली. दरम्यान, सचिन वाझे, कुंदन शिंदे आणि संजीव पांडे यांच्या न्यायालयीन कोठडीतही वाढ करण्यात आली आहे.

खंडणी वसुली व मनी लाँडरिंगच्या आरोपाखाली अनिल देशमुख यांना अटक करण्यात आली असून ईडी आणि सीबीआय अशा दोन तपास यंत्रणा या प्रकरणात तपास करत आहेत. सध्या देशमुख हे सीबीआयच्या ताब्यात असून देशमुख यांना आणखी तीन दिवसांची सीबीआय कोठडी मिळावी, अशी विनंती विशेष सीबीआय कोर्टाकडे आज करण्यात आली होती.

**पाहिजेत**

**मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले-मुली पाहिजेत.**

**: संपर्क :**

**९७६९०११६६७**

# मुंबई ऑन्कोकेअर सेंटरच्या पनवेल मधील शाखेचे आज भव्यदिव्य उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कर्करोगावर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अद्ययावत उपचार करणाऱ्या मुंबई ऑन्कोकेअर सेंटरच्या पनवेल मधील शाखेचे उदघाटन रविवार दिनांक १७ एप्रिल रोजी सकाळी ११ होणार असल्याची माहिती सेंटरचे डॉ.देवेंद्र पाल आणि डॉ. प्रितम कळसकर यांनी आज खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पुढे माहिती देताना त्यांनी सांगितले की, पनवेल तालुक्यातील खांदा कॉलनी मध्ये असलेल्या या सेंटरच्या उदघाटन सोहळ्यास उद्घाटक म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिध्द अभिनेत्री सामाजिक उद्योजिका आणि निर्माती डॉ. निशिगंधा वाड तसेच टाटा मेमोरियल हॉस्पिटल (ACTREC) नवी मुंबईचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांची उपस्थिती




असणार आहे.

मुंबई ऑन्कोकेअर सेंटर ही कर्करोगांवर अद्ययावत उपचार करणारी डे-केअर साखळीस्वरुप संस्था आहे. मुंबई व महाराष्ट्रात ८ सेंटर्स सध्या कार्यरत असून गेली ४ वर्ष कर्करोगग्रस्तांना उच्चशिक्षित कर्करोगतज्ञांमार्फत, सर्व आधूनिक सुविधांनी सज्ज अशा डे केअर सेंटर्समधे, वाजवी दरात उपचार उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबई ऑन्कोकेअर येथे सध्या १५ उच्चशिक्षित मेडीकल ऑन्कोलॉजिस्ट, ३० केमोथेरपी प्रशिक्षित परिचारीका व जवळपास २०० इतका प्रशासकिय कर्मचारी वर्ग असून, ८ डे केअर सेंटर्स रुग्ण सेवेत कार्यरत आहेत. गेल्या ४ वर्षाच्या कालावधीत मुंबई ऑन्कोकेअरने दरवर्षी १५,००० केमोथेरपी या हिशोबाने ६०,००० हून अधिक केमोथेरपी दिलेल्या आहेत. एकंदर १,००,००० पेक्षा अधिक रुग्णांना समाधानकारक समुपदेशन व उपचार दिलेले आहेत. रुग्णांच्या समीप, उच्चशिक्षित कर्करोगतज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उच्चश्रेणी व सुरक्षित पायाभूत सुविधांसह, वाजवी दरात उपचार उपलब्ध करून देण्याची खात्री डॉ.पाल व डॉ.कळसकर यांनी मुंबई ऑन्कोकेअरच्या वतीने दिली.

# खांदा कॉलनीतील उड्डाणपूलावरील जॉइंटमधील रबर आणि काँक्रीट भरण्याची प्रितम म्हात्रे यांची मागणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

ठाणा नाका येथून खांदा कॉलनी येथे जाताना रेल्वेचा उड्डाणपूल आहे. त्या पुलावर ठाणा नाका ते खांदा कॉलनी येथे जाताना ९ आणि खांदा कॉलनी येथून ठाणा नाका येथे येताना ९ असे एकूण १८ एक्सपान्शन जॉइंट आहेत. त्यातील काही जॉइंट मधील रबर आणि काँक्रीट निघाल्यामुळे तेथे खड्डे पडले आहेत. तेथून रहदारी करणाऱ्या वाहनचालकांना त्यात मुख्यत्वेकरून दुचाकी आणि रिक्षाचालकांना त्रास होत आहे. पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी या संदर्भात

.../२

# राजीव गांधी मैदान बस पार्किंगसाठी, मैदानात कचरा, मातीचे ढीग



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सेक्टर ११ येथील राजीव गांधी मैदानात पैसे घेऊन बस पार्किंग केल्या जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. तसेच या मैदानात कचरा, मातीचे ढीग, डेब्रीज टाकले जात असून मैदानाची दुरावस्था झाली आहे. पैसे वसूल करणाऱ्यावर कारवाईची मागणी केली जात आहे. रात्रीच्या वेळेस मद्यपी येथे हैदोस घालत आहेत. मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली जात नाही.

नवीन पनवेल येथील राजीव गांधी मैदानात महापालिकेच्या माध्यमातून राजीव गांधी मैदानात 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र' सुरू होणार आहे. त्याचे उदघाटन देखील काही महिन्यांपूर्वी करण्यात आले. मात्र सद्यस्थितीत येथील फुटपाथवर चिकन व मटण विक्रेत्यांनी आपली दुकाने थाटली आहेत. त्यामुळे क्रीडाप्रेमीना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. मागील महिन्यात पनवेल पालिकेने येथे कारवाई केली होती. मात्र त्याला न जुमानता पालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या नाकावर


.../२

# चिरनेर महावितरण कार्यालय बोकडविरा येथे हलविले; नागरिकांमध्ये संतापाची लाट

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील महावितरण कंपनीकडे चिरनेर कार्यालयाचे रुम भाडे भरण्यासाठी पैसे नाहीत. हे कारण पुढे करत चिरनेर गावातील सुमारे ५० वर्षे जूने असणारे महावितरणचे कार्यालय बोकडविरा येथील सिडकोच्या जागेत हलविले आहे.त्यामुळे चिरनेर परिसरातील जनतेचा पैसा आणि वेळ वाया जाणार असल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे.

चिरनेर परिसरातील जनतेला भेडसावणाऱ्या विजेच्या समस्यांचे निवारण करणारे महावितरण कंपनीचे कार्यालय चिरनेर गावात गेली ५० वर्षे कार्यरत आहे.परंतु सध्या या कार्यालयाचे रुम भाडे भरण्यासाठी महावितरण कंपनीकडे पैसेच नाहीत.हे कारण पुढे करत नूकताच बोकडविरा येथील सिडकोच्या जागेत सदर कार्यालय हलविण्याचा घाट महावितरण कार्यालयातील उप अभियंत्यांनी घातला आहे. त्यामुळे आदिवासी बांधवां बरोबर इतर जाती




धर्मातील जनतेला भेडसावणाऱ्या विजेच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी १०० ते २०० रुपयांचा भुर्दंड सहन करत उरण शहराजवळ असणाऱ्या बोकडविरा गावात जावे लागणार आहे.

.../२

# पावसाचे शुभ वर्तमान!

साधारण एका महिन्यांपूर्वी 'मूडीज' या जागतिक पतमापन संस्थेने भारताच्या वार्षिक वाढीचा दर ९.१ टक्के असेल, असा अंदाज केला होता. तेव्हा युक्रेनचे युद्ध नुकते सुरू झाले होते आणि जगभरातच इंधनाच्या किमती चढू लागल्या होत्या. हा अंदाज कमी करण्यापूर्वी, भारतीय अर्थव्यवस्था करोनोत्तर काळात जवळपास साडेनऊ टक्क्यांच्या वेगाने वाढेल, असे म्हटले जात होते. तेव्हा करोना संपत होता. युद्धाचे शंख फुंकले गेले नव्हते. आज अनेक अंगांनी जागतिक परिस्थिती बिघडली आहे. आशिया खंडातील अनेक देश आर्थिक संकटात सापडले आहेत. रशियाने युक्रेनवर चालवलेले आक्रमण कधी संपणार आणि कधी युद्धविराम होणार, हे समजायला मार्ग नाही. अशा वेळी, जगातील सर्व मोठ्या अर्थव्यवस्था संकटात सापडणार, यात नवल नाही. जागतिक बँकेने भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा जो नवा आठ टक्क्यांचा अंदाज व्यक्त केला आहे, त्याकडे या दृष्टीने पाहायला हवे. हा अंदाज म्हणजे भारतासाठी फार मोठा धक्का आहे. जागतिक बँकेच्या दक्षिण आशियावरील अहवालात भारतातील इंधन दरवाढ, म्हणावी त्या वेगाने न वाढणारी बाजारातील मागणी आणि रोजगार निर्मितीचे अपयश या मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. हे सर्वच मुद्दे योग्य आहेत. केवळ भारतच नव्हे, तर साऱ्याच दक्षिण आशियाला सन २०२२-२३ हे आर्थिक वर्ष काही बरे जाणार नाही, असे एकंदरीत दिसते; मात्र करोनाच्या पहिल्या लाटेनंतर भारताच्या अर्थकारणाने जी जबरदस्त उसळी घेतली होती, तिचे स्मरण जागतिक बँकेला द्यायला हवे. उद्या युक्रेनचे युद्ध संपले आणि जगातील इंधनाचा बाजार स्थिरावला, तर भारत सगळे अंदाजाचे आकडे चुकवून नवी उंची गाठू शकतो. भारतीय अर्थकारण आणि भारतातील पाऊसमान यांचा परस्पर संबंध कधी कधी जागतिक वित्तसंस्था नीट लक्षात घेत नाहीत. एकूण भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचा वाटा उदारीकरणानंतर कमी होत असला, तरी शेती आणि शेतीवर आधारित उद्योगांवर अवलंबून असणारा प्रचंड लोकसमुदाय हा मोठा ग्राहक आहे. या ग्राहकाचे वर्तन संपूर्णपणे शेतीच्या यशस्वी मोसमावर अवलंबून असते. हा शेतीचा मोसम भारतात मॉन्सून कसा होतो, यावर विसंबून असतो. गेली काही वर्षे भारतात भरपूर; पण बेशिस्त पाऊस पडत आहे. आणखी बरोबर ४५ दिवसांनी मॉन्सून केरळच्या किनाऱ्यावर धडकेल. यंदा हा पाऊस सरासरी गाठेल आणि बहुतेक राज्यांमध्ये चांगला होईल, असे भारतीय हवामानशास्त्र विभागाने आपल्या शास्त्रीय अंदाजात म्हटले आहे. प्रशांत महासागरातील 'ला निना' हा हवामानघटक कसा असेल, यावर बऱ्याचदा भारतातील पाऊसमान ठरते. यंदाचे देशभरातील आश्वासक चित्र महाराष्ट्रासाठी विशेष दिलासादायक आहे. विशेषकरून, मराठवाड्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस होईल, असे या अंदाजात म्हटले आहे. मराठवाडा हा कायमच तहानलेला असतो. तेथे पुरेसा पाऊस येणार, ही समाधानाची बाब आहे. महाराष्ट्रात पुरेसा पाऊस होणार असेल, तर आजच जलसंधारणाच्या साऱ्या कामांना जोरदार गती देण्याची गरज आहे. तसे झाले, तर पुरेसा जलसाठा होईल आणि सध्या अनेक तालुक्यांमध्ये जी कोरड पडली आहे; ती दूर होऊ शकेल. अर्थात, शेतकऱ्यांसाठी पाऊस किती पडतो, यापेक्षा तो योग्य वेळेत योग्य प्रमाणात पडतो का, हे महत्त्वाचे असते. नाही तर, भलत्या वेळचा पाऊस तोंडचा घास काढून नेतो. या अर्थाने अवेळी पडणारा पाऊस शेतकऱ्यांचे सारे बजेट उद्ध्वस्त करून टाकतो. अलीकडे, महाराष्ट्रात असे वारंवार घडते आहे. उद्या आपली अर्थव्यवस्था काहीशी कमी वेगाने वाढली, तरी भारताला शेजारी देशांकडचे लक्ष काढून घेता येणार नाही. श्रीलंका, नेपाळसहित अनेक देशांना सध्या मदत जातेच आहे. यातली आणखी एक दिलासा देणारी बातमी म्हणजे, गव्हाच्या विक्रमी उत्पादनामुळे काही देशांना मदत म्हणून; तसेच जगाच्या बाजारपेठेतही गहू पाठविता येणार आहे. भारत हा जगातला दुसऱ्या क्रमांकाचा गहू उत्पादक आहे. सध्या युद्धात अडकलेला युक्रेन युरोपला; तसेच इतरही देशांना मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची निर्यात करीत असतो. ही टंचाई भारतीय गहू दूर करू शकतो. युरोप, आखाती देश, उत्तर आफ्रिका, पूर्व आशियातील देश या साऱ्यांना भारतीय गहू पाठविता येईल. त्यासाठीचा राखीव साठा तर सध्या आहेच; पण पावसाचा अंदाज चांगला असल्याने येत्या हंगामातही गव्हाचे पुन्हा विक्रमी पीक येऊ शकते. या सर्व पार्श्वभूमीवर जागतिक बँकेने भारताचा विकासदर कमी राहील, असे म्हटले असले, तरी तसे ते होईलच, असे नाही. उलट, सध्याची युद्धस्थिती काही बाबतीत भारताला नव्या संधी देणारी आहे. जागतिक बाजारात इंधनदर जरा स्थिरावले, तर या आर्थिक वर्षात करोनाकाळ विसरून भारत नवी भरारी घेऊ शकेल. पावसाच्या शुभ वर्तमानाने तरी तशी द्वाही तरी फिरवली आहे.

# अखेर वर्षभरानंतर सिडकोला डांबरीकरणाचा मुहूर्त सापडला

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोलीतील एलआयजी भागात पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात मिळावे यासाठी कळंबोली सिडको प्रशासनाने गत वर्षीच्या मे महिन्यात मोठया जलवाहिनीचे काम केले. मात्र त्यासाठी खोदून ठेवलेला भला मोठा रस्ता पूर्ववत करण्यासाठी तब्बल एक वर्षाने सिडको प्रशासनाला मुहूर्त सापडला . हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.जनमताच्या रेट्यामुळे सिडकोला हे काम करावेच लागले.



कळंबोली वसाहतीमधील सिडको सेंट जोसेफ विद्यालयाच्या बाजूला असणाऱ्या पाण्याच्या टाकी पासून ते नजीकच्या एक.आय.जी भागात जलवाहिनी टाकण्याचे काम गतवर्षीच्या मे महिन्यामध्ये सडको प्रशासनाकडून करण्यात आले .यासाठी जवळपास येथील सर्वच रस्ता मधोमत खोदून त्यातून जलवाहिनी टाकली. जलवाहिनीचे काम पूर्ण झाले तरीही गेल्या वर्षभरामध्ये खोदलेला रस्ता पूर्ववत डांबरीकरण आणि चकाचक करण्याचे मुहूर्त काही सिडकोला सापडेना . सिडको प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे एकीकडे पाण्याची सोय झाली तर दुसरीकडे खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना दैनंदिन भेडसावणारी समस्या ही निर्माण करून ठेवल्या मुळे हजारो नागरिकांची गैरसोय करून ठेवली. नागरिकांकडून या बाबत संताप व्यक्त केला जात होता.विविध पक्ष ,राजकीय नेते ,पुढारी, पत्रकारांनी याबाबत आवाज उठवून सिडको प्रशासनाला जागे करण्यासाठी प्रयत्न केले. अखेर सिडको प्रशासनाला जनरेटा मुळे या कामासाठी मुहूर्त सापडला. कळंबोली चे सिडको अधिकारी राजेंद्र बनकर यांच्याकडे वारंवार दूरध्वनी केल्यानंतर ठेकेदार सापडत नाही ,मटेरियल गोळा करावी लागेल , लवकरच करतो असं वेळ काढून धोरण केले जात होते. मात्र कळंबोलीतील नागरिकांनी वारंवार याबाबत पत्र व्यवहार केल्याने प्रशासनाला हा खोदून ठेवलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करणे भाग पडले. या रस्त्यावर सेंट जोसेफ विद्यालयातील येणाऱ्या विद्यार्थी पालक व नागरिकांची वर्दळ फार मोठ्या प्रमाणावर असते. खोदलेल्या रस्त्यांमधून दुचाकीस्वारांना मार्ग काढताना गाडी कोसळून अनेक पालक-विद्यार्थी, अबालवृद्ध ,गरोदर महिला, जखमी झालेले आहेत .याबाबत अनेक वेळा दूरध्वनी करून सिडको प्रशासनाला सांगण्यात आले .मात्र या गंभीर समस्येकडे सिडकोच्या अधिकाऱ्यांना लक्ष देण्यास वेळ नव्हता. अखेरीस हनुमान जयंतीच्या मुहूर्तावर आज या खोदलेल्या रस्त्याचे डांबरीकरण होत असल्याने येथील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे .याबाबत सिडको प्रशासनाला धन्यवाद ही दिले जात आहेत.

# पंचमुखी मंदिरात मोठ्या रांगा ; भाविकांची गर्दी



पनवेलच्या पंचमुखी मंदिरात मोठ्या भाविकांची गर्दी दर्शन घेत होते. भविकाच्या प्रसन्न भावना दिसत होत्या खांदा वसाहतच्या शनि आणि हनुमान मंदिरात मोठमोठ्या रांगा लागल्या होत्या.

## मुरूड तेलवडे येथिल श्री हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव सोहळा साजरा

**दै.रायगड नगरी । मुरुड**

आज चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सर्वत्र हनुमान जन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. मुरुड तालुक्यातील तेलवडे गावातील श्री हनुमान मंदिरामध्ये श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सलग दोन वर्षांच्या कोरोना कालखंडानंतर या उत्सवासाठी मोठ्या संख्येने हनुमान भक्त उपस्थित होते.

चैत्र पौर्णिमेच्या दिवशी दिनांक १६/०४/२०२२ रोजी पहाटे पासुन श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी पहाटे पासुनच श्री हनुमानाच्या जन्मोत्सवाची कथेच्या किर्तनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सुर्योदयावेळी ६:२२ नंतर श्री हनुमान जन्मकाळ करण्यात आला, जन्मकाळ होताच पुष्प वर्षाव करुन सुंटारा, सुकामेवा, मिठाई प्रसाद म्हणून वाटले. यावेळी विधीवत श्री हनुमानाच्या मुर्तीला अभिषेक करुन पुजन करण्यात आले. त्यानंतर सर्व भाविकांनी दर्शन घेतले आणि या मुर्तीची पाळण्यात स्थापना करण्यात आली. यावेळी उपस्थित सुवासिनींनी पाळण्याला झोके देत पाळणा गीत गाण्यात आला नंतर आरतीने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## 30 वर्ष जुनी शौचालयाची टाकी फुटल्याने संपूर्ण वस्तीत पसरली दुर्गंधी

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषद हद्दीतील शिळफाटा उमरजी पटेल नगर सह्याद्री शाळेजवळ येथे पहाटे ४ वाजेच्या सुमारास ३० वर्ष जुनी शौचालयाची टाकी फुटल्याने मैला रस्त्यावर वाहिल्याने संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली. पहाटे ४ वाजता पसरलेला मैला हटविण्यासाठी खोपोली नगर परिषदेचे स्वच्छता कर्मचारी जवळजवळ ११ वाजता आले, तोपर्यंत या दुर्गंधीचा त्रास स्थानिक नागरिकांना सहन करावा लागला. हनुमान जयंती व रमजान सारखे पवित्र उत्सव सुरू असल्याने या दुर्गंधीमुळे नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे.



शौचालयाची टाकी ही धोकेदायक असल्याची तक्रार गेल्या दोन वर्षापासून सफाई कर्मचारी मुकादम शिवदास कांबळे व नागरिकांनी या वार्डांच्या लोकप्रतिनिधींसह नगर परिषदेकडे केली असल्याचे समजते. मात्र, 'स्वच्छ, सुंदर खोपोली' असल्याचे दाखविण्यासाठी आटापिटा करणाऱ्या खोपोली नगर परिषदेने या तक्रारींकडे लक्ष न दिल्याने आज या टाकीचा स्फोट झाला आणि मैला रस्त्यांवर पसरला.

खोपोली नगर परिषदेकडून स्वच्छता अभियानात सहभागी होण्यासाठी लाखो रूपये खर्च करण्यात येत असतात. खोपोली शहर 'सुंदर, स्वच्छ' असल्याचे दाखविण्यासाठी बॅनरबाजी व जाहिरातींवर लाखो रूपये खर्च करण्यात आले. मात्र मुळात खोपोली शहरातील स्वच्छता व सुंदरता किती तकलादू आहे, हे उमरजी पटेल नगरच्या आजच्या घटनेने उघड केले आहे. दोन वर्षापासून या टाकीला तडा गेल्याचे व ही टाकी धोकादायक झाल्याचे कळविल्यानंतरही त्याची दुरूस्ती का करण्यात आली नाही? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## चैत्र पौर्णिमेच्या पूर्व दिवसाला आ.प्रशांत ठाकूर आले वाकडाई दर्शनाला

युवा नेते चिन्मय मोने, शरद (बबन) जाधव, आत्माराम जाधव, प्रकाश मोरे, अनंत जाधव, दत्ता बोडेरे व उतेखोल ग्रामस्थांच्या वतिने आमदार प्रशांत ठाकुर यांचे पुष्पगुच्छ देऊन जोरदार स्वागत करण्यात आले. तसेच माणगांव नगरपंचायत पाणी पूरवठा सभापती तथा भाजप युवा नेते राजेश मेहता, नितीन दसवते, नामदेव खराडे, दिलीप उभारे सर हे देखिल उपस्थित होते. आमदारां सोबत अनेक सामाजिक समस्यां विषयी संवाद साधण्यात आला. नगरपंचायत पाणी पूरवठा सर्व कर्मचारी समावेशनाचा प्रलंबीत मुद्दा, तसेच महामार्गावरील वृक्षारोपण, व उतेखोल अंगणवाडी समस्यां बाबत आमदारांना अवगत करण्यात आले असता, त्यांनी ठामपणे आश्वासक उत्तर देत आपण तातडीने निवेदन द्या मग या समस्या सोडविण्या साठी मी योग्य तो प्रयत्न करीन असे उपस्थीत कार्यकर्त्यांना सांगितले आहे.

## तीन तासाच्या अथक प्रयत्ना नंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी चौथ्या मजल्यावरून माथेफिरुला उतरवले खाली

अग्निशमन दलाचे जवानांनी त्याला दोरीने बांधला व खाली उतरविला. खाली उतरवित असताना देखिल पुन्हा तो वर चढण्याचा प्रयत्न करीत होता. या अज्ञात माथेफिरुच्या कृत्याने इमारतीसह कामोठे वसाहतीतील नागरिक भयभीत झाले होते. त्या माथेफिरुला उतविताना नागरिकांची तोबा गर्दी जमली होती.

## खांदा कॉलनीतील उड्डाणपूलावरील जॉइंटमधील रबर आणि कॉंक्रीट भरण्याची प्रितम म्हात्रे यांची मागणी

एमएसआरडीसीच्या अधिकारयासोबत बोल्ने करून काम पूर्ण करण्यास सांगितले आहे.

याठिकाणी नुकतेच सदर खड्डा लक्षात न आल्यामुळे अचानक ब्रेक दाबून रिक्षा थांबल्याने तीन ते चार वाहने एकमेकांवर आदळून अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. संबंधित एमएसआरडीसी विभागातील अधिकारी सोनवणे यांच्याशी संपर्क साधून त्या विभागात रस्ता मेंटेनेसचे काम करणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना बोलवून सदर विषयाची माहिती घेऊन त्यांना नागरिकांची समस्या दाखवली. यावेळी सदरचे काम मेंटेनेसमध्ये येत नसल्यामुळे आम्ही केले नाही यासाठी वेगळे कामाचे प्रुवल घेऊन आम्ही काम पूर्ण करू असे उपस्थित असणाऱ्या अधिकार्यांनी सांगितले. यावर त्वरित योग्य ती कार्यवाही करून नागरिकांना रस्ता सुरळीत प्रवासासाठी मोकळा करुन द्यावा असे निर्देश दिले. यासाठी त्यांना जे काही सहकार्य लागेल ते करण्यात येईल असे सांगितले.

## राजीव गांधी मैदान बस पार्किंगसाठी, मैदानात कचरा, मातीचे ढीग

टिच्चुन पुन्हा दुसऱ्याच दिवशी फुटपाथवर चिकन व मटण विक्रेत्यांनी दुकाने उभारली. स्वयंघोषित समाजसेवक येथे हफ्ते गोळा करत असल्याने अतिक्रमण करणाऱ्यांना पाठबळ मिळत आहे. चिकन व मटण विक्रेत्यांमुळे खरेदी करणारे नागरिक रस्त्यावर गाड्या पार्क करतात. त्यामुळे येथे नित्याची वाहतूक कोंडी होते. त्यामुळे चिकन व मटण विक्रेत्यांवर कारवाई करण्याची मागणी क्रीडाप्रेमी करत आहेत. क्रीडांगणाची दुरावस्था पाहिल्यावर सिडको आणि पालिका प्रशासनाचे येथे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे पहावयास मिळत आहेत.

या क्रीडांगणावर दगड, माती यांच्या डेब्रिजचा ढीग पाहायला मिळू लागला असून मैदानाच्या जागेवर अतिक्रमण होऊ लागले आहे. संध्याकाळी आणि रात्रीच्या वेळेस मद्यपी येथे तळ ठोकून असतात. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन या ठिकाणी अनैतिक धंदे चालू असतात. मात्र पालिका आणि पोलीस याकडे कानाडोळा करत असल्याचा आरोप येथील क्रीडाप्रेमी करत आहेत.

## चिरनेर महावितरण कार्यालय बोकडविरा येथे हलविले; नागरिकांमध्ये पसरली संतापाची लाट

एकंदरीत आदिवासी बांधवांबरोबर, इतर नागरिकांचा वेळ व पैसा वाया जाणार असल्याने महावितरण कार्यालयातील अभियंत्यांच्या हम करो सो कायद्यामुळे परिसरातील जनतेत संतापाची लाट उसळली आहे.

चिरनेर पंचक्रोशीतील नागरिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे.त्याच्या भूमितील रहिवाशांना विद्युत पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी राज्याच्या उर्जा मंत्र्यांनी चिरनेर गावात सुमारे ५० वर्षा पूर्वी महावितरणचे कार्यालय सुरू केले.मात्र त्याच महावितरण कार्यालयाचे रुम भाडे भरण्यासाठी महावितरण कंपनीकडे सध्या पैसे नाहीत हे कारण पुढे करत सदर कार्यालय बोकडविरा येथे हलविण्याचा घाट महावितरण कार्यालयातील अभियंता घालत असतील तर ते या परिसरातील नागरिक सहन करणार नाही.या विरोधात जनता आंदोलन उभारेल असा इशारा रायगड जिल्हा परिषदेचे मा.सदस्य तथा शिवसेनेचे तालुकाप्रमुख संतोष ठाकूर यांनी दिला आहे.

## निर्सगाच्या कुशीत वसलेल्या चंदनवाडी गावचा सर्वांगीण विकास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षच करणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील चंदनवाडी ही वाडी निर्सगाच्या सानिध्यात असून त्याचप्रमाणे संपूर्ण ग्रामस्थ संस्कारीत आहेत, सर्व मंडळी सन २००८ पासून राष्ट्रवादी कॉंग्रेस समवेत विकासाचे रथात सामिल आहेत. त्यामुळे वाडीचा विकास झाला आहे, तर वनविभागांत अडकलेला गोरेगाव लोणेरे राज्य मार्ग ते चंदनवाडी ह्या रस्त्याचे भूमीपूजन आज होत असल्याचे पालकमंत्री तटकरे यानी रस्त्याचे भूमीपूजन कार्यकमांत सांगितले

या रस्त्यासाठी रु १० लक्ष , तर स्मशान जोड रस्त्यासाठी रु३ लक्ष मंजुर असल्याचे यावेळी सांगण्यात आले, वाडीचा उर्वरीत सर्व विकास टप्प्याटप्ध्याने भविष्यांत पूर्ण करण्यात येईल असेही या वेळी पालकमत्री तटकरे यानी सांगितले, कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती बबन मनवे, तालुका समन्वय समिती अध्यक्ष नाझीम हसवारे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, मुंबई कमिटी अध्यक्ष महेश शिर्के, महिला अध्यक्षा रेशमा कानसे, माजी सभापती छायाताई म्हात्रे, माजी उपसभापती मधुकर गायकर, माजी उप सभापती संदिप चाचले, अनिल बसवत, संतोष सावंत, विठोबा धुमाळ, रमेश रिकामे, राजेश दाभोलकर, संतोष खेडेकर, कृष्णा धुमाळ, सुरेश रिकामे, अशोक खेडेकर, पांडुरंग खेडेकर, रामचंद्र धुमाळ, बळीराम धुमाळ, रसिका दाभोलकर, शेवंती धुमाळ चंदनवाडी ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

## खोपटा पुलावर रिक्षा टेम्पोला अपघात

**दै.रायगड नगरी । उरण**

खोपटा पुलावरून जाणाऱ्या रिक्षा टेम्पोला ट्रेलरची धडक बसल्याने सदर अपघातात रिक्षा टेम्पोचे नुकसान झाले आहे.तर रिक्षा टेम्पो चालकास किरकोळ दुखापत झाली आहे.सदर अपघात हा शनिवारी( दि १६) सकाळच्या सुमारास घडला असल्याची माहिती वाहतूक पोलीसांकडून मिळत आहे.

## दिव्यांगांना शिवणयंत्रांची भेट

**दै.रायगड नगरी । मुंबई**

स्वर्गीय श्रीकृष्णगोपाल मोतीलाल लडिवाल या जुळ्या भावांच्या जन्मशताब्दीच्या स्मरणार्थ त्यांच्या परिवारातर्फे स्नेहज्योत दिव्यांग सेवा प्रतिष्ठान संस्थेच्या (दहिसर) प्रांगणात संस्थेच्या सहकार्याने दिव्यांगांसाठी शिवणयंत्र भेट देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

सचिव सुधा वाघ यांनी संस्थेच्या कार्याची ओळख सांगून सर्वांचे संस्थेतील दिव्यांग व कार्यकर्त्यांच्या हस्ते लडिवाल बंधूभगिनींना संस्थेच्या विद्यार्थ्यांनी बनविलेले पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करण्यात आले. लडिवाल बंधूभगिनींतर्फे त्यांच्याच हस्ते संस्थेतील तीन दिव्यांग विद्यार्थ्यांना शिवणयंत्र तर धवल दाम्पत्यास बिडींग यंत्र भेट देण्यात आले. यावेळी लडिवाल परिवाराचे सदस्य उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोहयात दफनभूमीची आवश्यकता

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा शहरासह वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोठया प्रमाणात लिंगायत, जंगम, गुरव समाज रहात असून समाजातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्यांचे दफन करण्यासाठी दफनभुमी नसल्याने समाज बांधवांना नाहक त्रास होत आहे.

लिंगायत समाज बांधवांना गाव तिथे दफनभुमी शासनाचा परीपत्रक असतानाही शासन व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाल्याने लिंगायत समाज बांधवाना दफनभूमी मिळत नाही.

रोहा शहर व लगत असलेल्या वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीत भुवनेश्वर व परीसरात लिंगायत वाणी, लिंगायत कुंभार, लिंगायत जंगम, लिंगायत गुरव यासह अन्य लिंगायत समाजाच्या पोटजाती चे लोक रहातात.या समाजातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्यांना लिंगायतांच्या विधीनुसार दफन करावे लागते. तालुक्यातील ग्रामीण भागातून, कामानिमित्ताने अन्य जिल्ह्यांतून व अन्य राज्यांतून मोठया प्रमाणात रोहा शहर, वरसे ग्रामपंचायतीमध्ये लिंगायत समाजाचे लिंगायत गुरव, जंगम यासह अन्य लिंगायत समाजातील समाज बांधव स्थायीक झाले आहेत.

रोहा शहर व वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीत लिंगायत,गुरव, जंगम समाज व अन्य लिंगायत समाजातील एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास विधीनुसार दफन करण्यासाठी दफनभुमी नसल्याने त्यांना मृतदेह दफन करण्यासाठी आपल्या मुळ गावी, अन्य जिल्ह्यांत, अन्य राज्यांत घेवुन जावे लागते. या दरम्यान समाज बांधवांना मोठा त्रास सहन करावा लागतो. गरीब समाज बांधवांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

शासनाचे लिंगायत वस्ती तिथे दफन भुमी परीपत्रक असतानाही रोहा शहरात व वरसे ग्रामपंचायतीच्या हद्दीत लिंगायत समाज बांधवाना दफनभूमी मिळत नाही. ही मोठी शोकांतिका असून या महत्त्वाच्या व जिव्हाळ्याचा विषयाकडे शासनाचे व लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष झाले आहे. यापुढे शासनाने अथवा लोकप्रतिनिधींनी या समस्या कडे लक्ष न घातल्यास लिंगायत समाज बांधव आंदोलनाचा पवित्रा घेणार आहेत.

## उड्डाणपुलाखाली आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील गांधी हॉस्पिटल जवळील उड्डाणपुलाखाली एका इसमचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, रंग सावळा, फ्रेंच कट दाढी, केस बारीक असून, अंगात फूल बाह्याचा सफेद रंगाचा टी शर्ट आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोलिस उपनिरीक्षक संजय देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

# म्हसळयाचे ग्रामदैवत श्री धाविरदेव महाराज यात्रोत्सव मोठ्या उत्स्फूर्तपणे आणि भक्तिमय वातावरणात संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळयाचे जागृत ग्रामदैवत श्री धावीरदेव महाराज यात्रोत्सव दरवर्षी चैत्र पौर्णिमेला साजरी होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या महामारीमुळे यात्रा होऊ शकली नाही. या वर्षी कोरोनाचे संकट टळले असल्याने शुक्रवार दिनांक १५ एप्रिल २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजलेपासून १६ एप्रिल रोजच्या पहाटे पर्यंत मोठया उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाली. भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री धाविरदेव महाराजांचे मंदिर हे पूर्वमुखी आसून गावाची संकटमोचक ग्रामदेवता आहे. धाविरदेव महाराज मंदिरात थेट सूर्यदर्शन होते. मंदिर गाभाऱ्यात श्री धाविरदेव, रवळनाथ, अवळनाथ, बापूजी, जोगेश्वरी, भैरी आणि काळेश्री यांचे जागृत स्थान आहे. देवतांचे चांदीचे मुखवटे, पादुका, अश्व आणि छत्र असून या पैकी काही देवस्थानाच्या स्वयंभु जागा गवळवाडी, दुर्गवाडी, चिराठी गावाशेजारी डोंगर कपारीत रमणीय ठिकाणी आहेत.



म्हसळा येथे चैत्र पौर्णिमेला श्री धाविरदेव महाराज यात्रेचे आयोजन करून या देवस्थानांना मानाने पालखीतून वतनदार, सालकारी, म्हशीलकर, कुलकर्णी, पोतदार, आणि ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने, भक्ती भावाने मूळ देवस्थानी श्री धाविर मंदिरात आणतात. मंदिरात विधीवत पूजापाठ, देवाचे मानपान झाले नंतर रात्री उशिरा देव वाजतगाजत पालखीत बसुन म्हसळा शहरात घरोघरी जाऊन भाविकांना श्री धावीर देवाचे थेट दर्शन मिळते. श्री धाविर देव मंदिर यात्रेपासून तालुक्यातील इतर ठिकाणच्या यात्रांना खऱ्या अर्थाने सुरुवात होते त्यामुळे म्हसळा येथील यात्रेला अनन्य साधारण महत्व आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमेला संपन्न होणाऱ्या श्री धाविर महाराज यात्रेला या वर्षी तालुक्यातील ८४ गावातील लोकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत चैत्रकाठीला घुंगुर, लाइट आणि विविध पद्धतीने आकर्षकपणे सजवत उंचच उंच काठ्या घेऊन यात्रेत सहभागी झाल्या होत्या. सर्व समाज, सर्वधर्मीय बांधव यात्रेत सहभागी होऊन गावाच्या एकतेचे व अखंडतेचे प्रतिक दर्शविणारा हा अविस्मरणीय प्रसंग सर्वांच्याच कायम स्मरणात राहणारा असा आहे. केलटे गावातील काठीला यात्रेत प्रथम मानाचे स्थान असून या काठीची श्री धावीरदेव भेट दिघी नाक्याशेजारच्या होळीच्या खाचरात होते. या वर्षी ह्या भेटीत मोठा उत्साह होता.

गावातील लहानथोर मंडळी एकसुरएकातालात वाजतगाजत लेझीम पथकाने केलटे येथील चैत्र काठीने म्हसळा यात्रेत आगळे वेगळे चैतन्य निर्माण करून यात्रेचा शुभारंभ केला. त्यानंतर खारगाव खुर्द आणि इतर २० गावाहून आलेल्या काठयांची गळाभेट होळीचे प्रांगण ते श्री धाविर देव मंदिरात झाली. नवसाला पावणारे दैवत म्हणूनच श्री धाविर देवांमुळे गावावर, शहरात कोणत्याही प्रकारचे संकट,कुठलीही साथ आगर कोणत्याही प्रकारची लागण होत नाही असे जुने-जाणते लोक आजही ठामपणे सांगतात. शहरातील कुंभार समाजाकडे देवळाच्या पुजाअर्चे चे कार्यक्रम पूर्वापार आसून शहरातील कुंभार समाज म्हशीलकारबंधू, वतनदार, सालकारी, मानकरी, पोतदार आणि हिंदु ग्रामस्थ यात्रेची संपूर्ण जाबाबदारी पार पाडतात. यात्रेच्या मध्यरात्री गावातील रोहिदास समाजातील भक्तगणांकडून बळ काढून शिवबांधणी (वेसबांधणी) हा सोहळा श्रद्धेने पार पाडण्याची परंपरा आजही सुरु आहे ती त्यांनी नेटाने पार पाडली.यात्रा उत्सवात शांतता सुव्यवस्था चोखपणे पार पाडण्यासाठी म्हसळा पोलीस ठाणे स.पो.निरीक्षक उद्धव सुर्वे यांचे पोलिस यंत्रणेने आपली भूमिका अतिशय चोख आणि जबाबदारी पूर्वक पार पाडली. यात्रेकरूंची तहान भागविण्यासाठी थंडगार पाणी व्यवस्था म्हसळा जैन समाजाने सालाबादप्रमाणे जैन मंदिर प्रांगणात करमणूक कार्यक्रमाचे आयोजन करून केली होती.

म्हसळाचे यात्रेत सहभागी उंचच उंच चैत्र काठ्या, विद्युत रोषणाई, धावीरदेव मंदिरात भाविकांची दर्शनासाठी असलेली रिघ पाहता दोन वर्षानंतरही यात्रेत मिठाईचे, विविध खाद्यपदार्थ आणि खेळणी दुकानाची संख्या आणि खरेदीसाठी ग्राहकांची याहू गर्दी पहायला मिळावी.

## श्री जोगेश्वरी मातेच्या पालखी सोहळ्याची जय्यत तयारी



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

कोरोनाच्या जागतिक महामारीच्या काळात गेली दोन वर्षे नागोठण्याची आराध्य ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराजांच्या चैत्र पालखी सोहळ्यात खंड पडला होता. मात्र आता कोरोनाच्या धक्क्यातून सर्वजण सावरले असल्याने व कोरोनाचे अनेक निर्बंध शासनाकडून शिथिल करण्यात आल्याने ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेचा पालखी सोहळा आज रविवार दि. १७ एप्रिलला सकाळी ९ वाजता उत्साहात सुरू होणार आहे.

या पालखी सोहळ्याची जय्यत तयारी उत्सव समितीकडून करण्यात आली आहे. श्री जोगेश्वरी मातेच्या चैत्र पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांच्या चैत्र पालखी सोहळ्यानिमित्त मंदिरात होणारे धार्मिक विधी व पालखी सोहळ्यासाठी बँकेतील लॉकरमध्ये सुरक्षितपणे ठेवण्यात आलेले श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांचे मुखवटे व दागिने श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव भाई टके यांच्या हस्ते मंदिरात नेण्यात आले.

यावेळी भाई टके यांच्यासमवेत उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत, मंगेश कामथे, विनय गोळे, प्रथमेश काळे, राजा गुरव, मंदार चितळे, पांडुरंग कोळी, सुदर्शन कोटकर, मनोज भोसले, केतन भोय व उत्सव समितीचे इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

दरम्यान ग्रामदेवतांचा पालखी सोहळा दोन वर्षांनंतर तसेच रविवारी सुट्टीच्या दिवशी सुरु होत असल्याने नोकरी, व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असलेले अनेक चाकरमानी व माहेरवासिनी आपल्या मूळ गावी नागोठण्यात आले आहेत. ग्रामदेवतांच्या पालखी सोहळ्यानिमित्त ग्रामदेवतांचे दर्शन आपल्या घरासमोर होणार असल्याने सर्व नागरिकांमध्ये उत्साहाचे व आनंदी वातवरण निर्माण झाले आहे.

## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम डॉ. बाबासाहेबांच्या नवीन तस्वीरीचे अनावरण करून तस्वीरिचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप ,तालुका बौद्ध समाज सेवा संघाचे उपाध्यक्ष विश्वनाथ जाधव,खजिनदार चंद्रशेखर कांबळे,सदस्य जगदीश जाधव,राजेश शिर्के व विद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात सर्वप्रथम विधीवत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अनावरण करून सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. तसेच राजेश शिर्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. बाबासाहेबांचे विचार व त्यांनी घालून दिलेल्या शिकवणीचे अनुकरण करून आपल्या जीवनाची वाटचाल केली असता आपले जीवन यशस्वी होईल असे सांगितले. तर चंद्रशेखर कांबळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.या जयंती सोहळ्यानिमित्त विद्यार्थी वर्गामध्येही मोठा उत्साह दिसून आला.



## अपघात झाला आणि आरोपी पोलिसांच्या तावडीत सापडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भंगार विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या २४ वर्षीय इसमाच्या मानेवर सुरा ठेवून त्याला लुटणाऱ्या दोन आरोपींचा पुढे अपघात झाला आणि ते पोलिसांच्या तावडीत सापडले. पनवेल शहर पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक करून त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

पनवेल तालुक्यातील कोळखे येथे आताऊल्ला अब्दुल खान या भंगार विक्रेत्याच्या मानेवर सुरी ठेवून दोघा आरोपींनी त्यांच्याकडील रोख रक्कम लुटली. त्यानंतर ते त्यांच्या दुचाकीवरून पळून गेले.

भंगाराच्या दुकानाच्या पुढे जाऊन पलीकडच्या रस्त्याने ते पळून जात असताना स्पीड ब्रेकरवर त्यांचा अपघात झाला. त्यात ते चोरटे जखमी झाले. यावेळी शहर पोलिसांना बोलावण्यात आले. चोरट्यांचा अपघात झाल्याचे समजताच भंगार विक्रेता देखील तेथे गेला व त्यावेळी त्याने आबिद वजीत सय्यद (वय २४, राहणार वडघर) आणि आयान नूरहुसेन खान (१९, पारगाव-दापोली) याच दोघा आरोपींनी त्याच्या मानेवर सूरी ठेवून पैसे लंपास केले असल्याचे पोलिसांना सांगितले. शहर पोलिसांनी जखमी आरोपींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर उपचार करून त्यांना अटक करण्यात आली.

न्यायालयाने त्यांची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे. पोलिसांनी आबिद वजीत सय्यद आणि आयान नूरहुसेन खान यांच्याकडून रोख रक्कम देखील हस्तगत केली आहे. त्यांच्या अटकेमुले अनेक गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यातील आबिद वजीत सय्यद याच्यावर विविध पोलिस ठाण्यात २० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत.

## वाघजाई कोंडजाई देवस्थान देवपूर येथे उद्या १८ एप्रिल रोजी भव्य जत्रोत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील देवपूर येथील वाघजाई कोंडजाई देवस्थान देवपूर चा जत्रा उत्सव सोमवार दि. १८ एप्रिल २०२२ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा जत्रा उत्सव पुरातन काळापासून अठरा गाव वाघजाई कोंडजाई देवस्थान देवपूर व आठ गाव भैरवनाथ देवस्थान कोंढवी या नावाने ओळखला जातो.

वाघजाई कोंडजाई देवस्थान देवपूर हे देवस्थान शिवकाळातील असून महाराष्ट्र शासनाची सनद प्राप्त असलेले पुरातन मंदिर आहे या पुरातन मंदिराच्या जत्रा उत्सवाला कोंढवी परिसरातील १८ गावातील गावकरी उंच सासन काठ्या व घाटधुपारत घेऊन जत्रोत्सवात सहभाग घेतात. १८ गावातील गावकरी आपल्या गावातील उंच काठ्या रात्री २ ते ३ पर्यंत घेऊन येतात. या उंच काठ्यांना त्या गावाचे निशाण असे म्हटले जाते.

देवपूरचा हा जत्रोत्सव रात्री १८ एप्रिल २०२२ ला सुरू होऊन दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता संपते. देवपूर येथील महाडिक घराण्यातील सालकऱ्याला मानेला बांधुन उंच बगाडाला ५ फ ऽऱ्या मारुन गोल गोल फिरवले जाते. हा चित्त थरारक प्रसंग पाहण्यासाठी परिसरातील हजारो भाविक जत्रा उत्सवाला भेट देत असतात. अशा शिवकाळापासून चालू असलेल्या अठरा गाव वाघजाई कोंडजाई देवस्थान देवपूर व आठ गाव भैरवनाथ देवस्थान कोंढवीच्या जत्रोत्सवाला जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन देवपूर जत्रा उत्सवाचे तसेच अठरा गाव वाघजाई कोंडजाई देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.सत्यवान महाडीक महाराज यांनी केले आहे.

## भरधाव वाहनांच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका भरधाव वाहनाची धडक महिलेस बसल्याने त्यात ती गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू पावली आहे. पनवेल-मुंब्रा महामार्गावर कामोठे ब्रिजवर एका महिलेला भरधाव वाहनाची धडक महिलेस बसल्याने त्यात ती गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू पावली आहे.

## भिम सेवा मंडळ यशोधरा महिला मंडळ खांब यांच्या वतीने भिम जयंती उत्सहात साजरी

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

भिम सेवा मंडळ व यशोधरा महिला मंडळ खांब,ता.रोहा यांच्या वतीने भिम जयंती विविध प्रकारच्या कार्यक्रमानी मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली.

यावेळी रात्रौ.ठिक १२ वा.बुद्धवंदना,सकाळी ८:३० वा. पंचरंगी ध्वजारोहन,९:३० वा.राजिप शाळा खांब येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.१० वा.ग्रामपंचायत खांब येथे बाबासाहेब यांचा प्रतिमेस पुष्पहार अर्पण,तर दु.१२ वा.वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा व इतर स्पर्धा संपन्न करण्यात आल्या.तर सायं.४ वा.खांब बुद्धविहार-वैजनाथ रोड,मुंबई-गोवा हायवे व खामकर आली-हनुमान मंदिर-होळी माळ-वैजनाथ रोड-खांब बुद्धविहार पर्यंत रँलीचे आयोजन करण्यात आले होते.तद्नंतर रात्रौ ९ वा.स्नेहभोजन आदी कार्यक्रम यावेळी संपन्न करण्यात आले.

कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर गत दोन वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यंत साध्या पद्धतीने साजरी करण्यात आली. परंतू या वर्षी आठ दिवस अगोदरच या जयंती सोहळ्याची मोठी तयारी करण्यात आल्याने भिम सेवा मंडळ व यशोधरा महिला मंडळ खांब व खांब ग्रामस्थ तसेच महिला वर्ग यांच्यामध्ये मोठा उत्साह दिसून येत होता.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, मौजे : करंबेली तर्फे तळोजा, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील पुढील तक्त्यात नमूद केलेली मिळकत भाडेपट्ट्यावर घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करंबेली तर्फे तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन क्र. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती भो.वर्ग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १५ | १५ | १ | ०-४९-६०<br>पो.ख.०-१२-६०<br>एकूण ०-६२-२० | ४.६२ |
| पैकी अविभाज्य हिश्यातील ०-१६-०० हे.आर.चौ.मी. पैकी (१६ गुंठे) क्षेत्राचे कुलमुखत्यार पत्र | | | | |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्यही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटमेचमेंट, लीज, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१६/०४/२०२२

**सही/-**
**श्री.अरुण दत्तात्रेय पाटील**
**रा.पनवेल, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९३२४९७७३०९**
**९३२३०१५८२५**



मा.पोळ साहेब
**प्रो.जमा.६-२५** **अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश पाटील**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रिमिनल एम.ए.नं.११/२०२२
ने.ता.२४/६/२०२२

**श्री.संदेश रंगनाथ पाटील**
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.वशेणी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
**ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वशेणी
ता.उरण, जि.रायगड — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : वशेणी, ता.उरण, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांची आजी **कै.मनीबाई केशव पाटील** यांचा **दि.२८/१२/१९९८** रोजी मौजे : वशेणी, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधनाने अर्जदार यांचे आजीची मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे आजीची मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही. तसा पंचायत समितीने व ग्रामपंचायत वशेणी, ता.उरण, जि.रायगड मधून अर्जदार मधून यांचे आजीची मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात क्रिमिनल एम.ए.नं.११/२०२२ दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म मृत्यू नोंदणीबाबत **कै.मनीबाई केशव पाटील** मृत्यू **दि.२८/१२/१९९८** बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर काव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे आजीची **दि.२८/१२/१९९८** मृत्यू नोंदीबाबत सर्टीफिकेट मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १२/०४/०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, उरण**



मा.मुजावर साहेब यांचे कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**श्री.विशाल अनंत मुंडकर**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३५२/२०२२
नि.नं.११/ड
ने.ता.८/६/२०२२

**१) श्री.संदीप विजय कडुलकर**
वय : ५८ वर्षे, धंदा : नोकरी
**२) कु.किरण संदीप कडुलकर**
वय : २४ वर्षे, धंदा : शिक्षण
दोघेही मुळ रा.सी/९, निर्मण विहार, सीपीडब्लूडी कॉम्प्लेक्स,
बामबुलीम कॉम्प्लेक्स, उत्तर गोवा, गोवा-४०३२०२
दोघेही सध्या रा.ई/४०५, सत्यकुंज कॉम्प्लेक्स,
सेक्टर ३६, प्लॉट नं.४१ व ४२, कामोठे,
ता.पनवेल-४१०२०६, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार क्रं.१ यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्रं.२ यांची आई **स्नेहा संदीप कडुलकर** या दि.०६/०५/२०२१ रोजी मौजे : कामोठे, ता.पनवेल येथे मयत झाले आहेत. सदर मयत **स्नेहा संदीप कडुलकर** यांनी त्यांच्या हयातीत अर्जदार क्रं.१ यांचेसोबत खालीलप्रमाणे वर्णन केलेली सदनिका दि.०८/०८/२०१९ रोजीच्या 'सेल डिड' या दस्ताने **१) श्री.राहूल धनाजी मोरे व २) श्री.धनाजी कुंडलिक मोरे** यांच्याकडून खरेदी केलेली असून सदरचा दस्त पनवेल येथील मे.दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्त क्र.पवल-३/१२६०४/२०१९ अन्वये दि.०८/०८/२०१९ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेला आहे. सदर सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : कामोठे, ता.पनवेल येथील सेक्टर-३६ मधील प्लॉट नं.४१ व ४२, वरील 'सत्यकुंज कॉम्प्लेक्स' या इमारतीमधील ई विंग मधील सदनिका क्र ४०५, क्षेत्र ४८.०१ चौ.मी. ही सदनिका**

आता वर नमूद केलेली सदनिका मयत **स्नेहा संदीप कडुलकर** यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता त्यांनी संबंधित कार्यालयात चौकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयत **स्नेहा संदीप कडुलकर** यांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत **स्नेहा संदीप कडुलकर** यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१६ माहे ४ सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# अलिबाग, मुरूड, श्रीवर्धनमधील समुद्र किनारे पर्यटकांनी फुलले



**दै.रायगड नगरी । मुरुड**

१० वी १२ वीच्या परीक्षा संपून या आठवड्यात सलग सुट्ट्या देखील आल्यामुळे मोठ्या प्रमाणावर राज्यातील पर्यटक रायगडच्या समुद्रकिनारील पर्यटन ठिकाणांकडे वळू लागले आहेत. १ मे, नंतर उन्हाळी सुट्टी सुरू होणार असल्याने आणि कोरोना मुक्त वातावरणामुळे कुटुंबासमवेत मोठ्या संख्येने पर्यटक या हंगामा मध्ये फिरण्यासाठी समुद्रकिनारी येऊ लागले असल्याने हळूहळू मुरुडचे पर्यटन फुलू लागले आहे.

कोरोना मुक्त वातावरणा मुळे रायगडातील अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन आदी समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलून जातील असे स्पष्ट संकेत बुधवारी लॉजिंग आणि हॉटेल्स व्यवसायिकांनी बोलताना दिले होते. वरील तिन्ही ठिकाणी जलवाहतूकीची मोठी साधने उपलब्ध असल्याने वाहने आणि प्रवाशी वाहतूक जलद आणि नजीकच्या मार्गाने जोडली गेली असून भविष्यात मुंबई ते काशीद बीच पर्यत क्रूझ जलवाहतूक सुरु होणार असल्याने रायगडचे समुद्रकिनारे आधिक लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचणार यात शंकाच नाही. महाराष्ट्र राज्यासाठी आणि व्यावसायिकांसाठी समुद्रकिनारी वाढते पर्यटन म्हणजे मोठे उत्पन्न देणारा उद्योग ठरणार आहे. कोकणातील सर्वच किनारे रमणीय असून आधिक मोठया संख्येने पर्यटक किनारी पर्यटनाकडे खेचले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे रखडलेले उत्तम रुंद रस्ते प्राधान्याने पूर्ण व्हायला हवेत.

वळणावळणाचे रस्ते ही रायगडची अनेक वर्षांपासूनची डोकेदुखी आहे. त्यामानाने बारामती, सोलापूर, कोल्हापूर चे सरळ आणि रुंद डाम्बरी रस्ते पाहून अवाक व्हायला होते. कोकणात पाऊस भरपूर पडतो हे माहीत असूनही मजबूत आणि नवीन तंत्र ज्ञानाचे रस्ते होणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात रस्ते करतांना ही डांबर आहे की काळे तेल, हेच हल्ली समजून येत नाही.


रायगडातील मुरूड-जंजिरा तालुका ऐतिहासिक वास्तू आणि निसर्गरम्य तालुका म्हणुन प्रसिध्द असून जंजिरा संस्थान ची राज-धानी होती. बारशिव, काशीद, सर्वे, नांदगांव, मुरूड असे पांच ते सात समुद्र बीच तालुक्यात असून येथील किनाऱ्यावर फिरण्यात एक वेगळीच मौज वाटते.

या आठवड्यात गुरुवार पासून पर्यटकांची वर्दळ सुरू झाली आहे. मुरूड मध्ये पर्यटकांची लॉजिंग बुकिंग सुरू झाल्याची माहिती हिरा रेसिडेन्सी लॉज चे मालक महेंद्र पाटील, यांनी दिली.सलग सुट्टी असल्याने चाकरमानी वर्ग कुटुंबातील सदस्यांना घेऊन पर्यटनासाठी बाहेर पडतील असे संकेत पाटील, यांनी बोलताना दिली.

रायगडच्या किनाऱ्यावर वॉटर स्कुटर्स, बनाना राईडर्स, समुद्रातील बोटिंग असे जलक्रीडांची साधने देखील उपलब्ध झाली आहेत. श्री हरिहरेश्वर (दक्षिण काशी), दिवेआगर, जीवना बीच, कडे जाण्यासाठी अलिबाग हुन मुरूड तालुका मार्गे आगरदांडा ते दिघी खाडीतून जंगल जेटीने वाहने घेऊन थेट जाण्याची सुविधा रात्री पर्यंत उपलब्ध आहे. याचाच अर्थ अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन हा सागरी किनारा पर्यटन विकासात महत्वाची भूमिका बजविणार आहे. कारण रायगडात धार्मिक, ऐतिहासिक, आणि निसर्गरम्य अशी स्थळे भरपुर आहेत. शिवाय पुढे रत्नागिरी कडे जाण्यासाठी हाच जलमार्ग महत्व-चा ठरणार आहे. सध्या दुपारी तापमान ३२ ते ३४ सेल्सिअस दरम्यान असले तरी किनाऱ्यावर सायंकाळी ६ नंतर थंडपणा जाणवतोय.

## संक्षिप्त...

### गावदेवी प्रीमियर लीगला मोठ्या उत्साहात सुरुवात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील प्रतिष्ठेची मानली जाणारी गावदेवी प्रीमियर लीगची सुरुवात शुक्रवार दि. १५ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात करण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे वर्ष आठवे गावदेवी प्रीमियर लीगची ही स्पर्धा असून अंडरआर्म बॉक्स क्रिकेट सामने खेळवले जातात. गावदेवी मंदिरासमोरील प्रांगणात ही तीन दिवसीय स्पर्धा असून त्याचा शुभारंभ पत्रकार संजय कदम यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी आयोजक कमिटी मेंबर शांतनु घरत, विकी काळे, जागृत भोईर, ओमकार धावत्रे, राहुल राऊत, रवी शेंडे, ऋतिक बदले, अनुराग घरत, अवधूत घरत, श्रीकांत भोपी, संजय पाटील आदि उपस्थित होते.

### उपजिल्हा रुग्णालय परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शहरातील उपजिल्हा रुग्णालय परिसरात एका इसमाचा मृतदेह आढळून आला आहे असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलिस करीत आहेत.

सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ४५ वर्षे, चेहरा उभट, मिशी व दाढी वाढलेली काळी व बारीक, ऊंची ५ फुट ५ इंच, रंग सावळा असून अंगात सफेद कपडा गुंडाळलेला आहे.

या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलिस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोलिस उपनिरीक्षक संजय देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# गडब येथील काळंबादेवीची यात्रा उत्साहात

## देवीच्या दर्शनासाठी, देवकाठ्या स्पर्धा पाहण्यासाठी भाविकांची गर्दी



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील गडब येथिल काळंबादेवीच्या यात्रेत हजारो भाविकांनी हजेरी लावुन देवीचे दर्शन घेतले तर यात्रेतील प्रमुख आकर्षण आसणा-या देवकाठ्या स्पर्धा पाहण्यासाठी भाविकांनी गर्दि केली होती. तर गडब येथील ग्रामस्थ हेमंत तुकाराम पाटील यांनी काळंबादेवीला सोन्याचा मुखवटा अर्पण केला. या सुर्वण मुखवट्याची गडब गावातुन पालखी काढण्यात आली होती या पालखी सोहळ्यात प्रमाणात भाविक सहभागी झाले होते.

प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षिही काळंबादेवीच्या यात्रेत भाविकांची गर्दी होती. सकाळी पारंपारिक पध्दतीने मंत्रपुष्पाजंली होवून देवीला अभ्यंग स्नान घालुन विधीवत पुजा करण्यात आली त्यानंतर सोन्याचा सुशोभित मुकुट रंगीबेरगी कपडे सोन्याच्या अलंकारांनी देवी श्रुगारली गेली तर यात्रेत विविध खेळण्याची दुकाने, मिठाईची दुकाने, शोभेच्या वस्तु, इमिटेशन ज्वेलरीची दुकाने आदि वस्तुची मांडण्यात आली होती, खेळण्याच्या दुकानात लहान मुलांनी गर्दी केली होती व खेळणी खरेदी करण्याचा आनंद लुटत होती तर इमिटेशन ज्वेलरीच्या दुकानात महिलांनी गर्दि केली होती तर तरुणवर्ग डीजे व ढोलाच्या तालावर नृत्य करण्यात मग्न होते.

तर दुपारी गडब गावातुन काळंबादेवीची पालखी वाजत गाजत मंदिरांत आणण्यात आली नंतर परिसरातील गावातुन वाजत गाजत ग्रामस्थांनी आणलेल्या उंचच उंचचदेवकाठ्या उभारण्यात आल्या या वेळी देवकाठ्या स्पर्धा पाहण्यासाठी परिसरातील नागरीकांनी गर्दि केली होती. या देवकाठी स्पर्धेत जांभेळा ग्रामस्थांनी विजेतेपद मिळवुन विजेते पदाची हॅट्रीक केली.

आधुनिक युगातही गावाकडच्या यात्रामध्ये तरुणांचा उत्साह जाणवत होता अगदी व्यवसाय व शिक्षणा निमित्त बाहेर गेलेल्या तरुणांनी यात्रेत हजेरी लावली होती. तर नवसाला पावणारी काळंबादेवी अशी देवीची ख्याती असल्याने मुंबई- ठाणे येथुन तसेच परिसरातील भाविकांनी नवस फेडण्यासाठी यात्रेत गर्दि केली होती तर कांळबादेवीचे मंदिर मुंबई- गोवा महामार्गालगतच असल्याने येथुन जाणा-या पर्यटकांनी देखील यात्रेत हजेरी लावली.

# पनवेल परिसरात मातीच्या माठांना वाढती मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उन्हाळ्यात मनुष्याला लागणारी तहान भागविण्यासाठी माठातील पाणी सर्वोत्तम मानले जाते. त्यामुळेच उन्हाळ्याची चाहूल लागताच माठाची मागणी नागरिकांकडून सुरु होते. याच पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील नागरिकांकडून देखील मातीच्या माठाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे.

माठाची मागणी वाढल्याने माठ बनविणारे कारागीर देखील कामात मग्न असल्याचे चित्र पनवेल परिसरात कुंभारवाडा परिसरात व माठ विक्रेत्यांकडे दिसत आहे. पनवेल शहरातील रस्त्यांवर माठ विक्रेते माठ विक्री करत असल्याचे चित्र दिसत आहे.

माठाच्या आकारानुसार १५० ते ३०० रुपये दरम्यान माठाचे दर आहेत. मागील वर्षीपेक्षा यंदा उन्हाची तीव्रता जरा जास्त असल्याने मातीपासून तयार झालेल्या माठांची मागणी वाढल्याचे चित्र दिसत आहे.

# 'आम्ही गिरगांवकर'संस्थेचा 'रंग दे माझी शाळा'उपक्रम लोहारे प्राथमिक शाळेमध्ये ही सुरुवात : गौरव सागवेकर

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

कोरोना काळात मुख्यमंत्री ना.उध्दव ठाकरे यांनी आवाहन केल्यानंतर केवळ १५ मिनिटांतच ज्या संस्थेने धनादेशासह तातडीने प्रतिसाद दिला. त्या 'आम्ही गिरगांवकर'संस्थेचा 'रंग दे माझी शाळा' हा शाळा रंगविण्याचा उपक्रम ही शैक्षणिक गुणवत्तेला प्रगतीपथावर नेण्याची सुरूवात असल्याची ग्वाही संस्थेचे अध्यक्ष गौरव सागवेकर यांनी दिली.

याप्रसंगी व्यासपिठावर संस्थेचे उपाध्यक्ष शशांक धारगळकर, सचिव मिलींद वेदपाठक, सचिव शिल्पा नायक,सदस्य कुणाल लिमजे यांच्यासह वनविभागाचे अशासकीय सल्लागार मंदार गडकरी, प्रांताधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी नायब तहसिलदार सुरेश खोपकर, तहसिल कार्यालयाचे प्रतिनिधी मंडल अधिकारी मुंडेकर, सरपंच शिवराम पवार, उपसरपंच निलेश साळुंखे, माजी उपसभापती संभाजीदादा साळुंखे, माजी सरपंच रामचंद्र साळुंखे, प्रदीप नरे, प्रदीप सुर्वे व रघुनाथ वाडकर, हरिश्चंद्र साळुंखे, अशोक नरे, दिलीप नरे, पांडूरंग नरे, डॉ.राहुल निकम, तलाठी वार्डे तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात गौरव सागवेकर यांनी, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी कोणताही राजकीय रंग नसलेल्या उपक्रमांचा राज्यभर प्रसार करण्यासाठी रंग दे माझी शाळा हा उपक्रम मान्य केला असून मुख्यमंत्री महोदयांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी हर्षल प्रधान यांचे स्वीय सहायक म्हणून काम करताना माननीय मुख्यमंत्री महोदयांचे थेट जनतेसंदर्भातील विचार सर्वदूर पोहोचविण्याची संधी प्राप्त होत असल्याचे सांगितले. यामध्ये महाराष्ट्राच्या सरकारला तब्बल ७५ टक्के परराज्यातील नोकरशहांचा पगार करावा लागत असून महाराष्ट्रातील मराठी माणसं युपीएससी आणि एमपीएससी परिक्षांसह स्पर्धा परिक्षा देण्याबाबत टाळाटाळ करताना दिसून येत असल्याने सरकार जरी महाराष्ट्रीयांचे असले तरी प्रशासन मात्र बिगर महाराष्ट्रीय चालवित असल्याचे खेदाने नमूद करावे लागत असल्याने भविष्यात अधिकाधिक प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्रातीलच असावेत, असे मत यावेळी व्यक्त केले. आम्ही गिरगांवकर संस्थेतर्फे पोलादपूर तालुक्यात एमपीएससी आणि युपीएससी परिक्षांसह स्पर्धा परिक्षांचा अभ्यासक्रम शिकविण्याचे मार्गदर्शन उपलब्ध केले जाईल, अशी ग्वाहीही यावेळी गौरव सागवेकर यांनी दिली.

प्रास्ताविकामध्ये मुख्याध्यापक दिक्षित यांनी, लोहारे ही रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा मॉडेल स्कूल म्हणून निश्चित झाली असून शाळेच्या विविधांगी विकासासोबतच काही महत्वाच्या भौतिक बाबींची पूर्तता करण्याची गरज असून आम्ही गिरगांवकर या संस्थेने आवर्जून या गरजेची पूर्तता करण्याचे आवाहन केले. यावेळी मुख्याध्यापक दिक्षित आणि निकम यांचा सत्कार आम्ही गिरगांवकर संस्थेतर्फे करण्यात आला. यावेळी लोहारे शाळेची शिफारस केल्याबद्दल मंदार गडकरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.


### जमीन विकणे आहे

**मे.एन.डी.आर वेअर हौसिंग प्रा.लि.** यांच्या मालकीची पनवेल तालुक्यातील मौजे : आपटे व डेरवली येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन विकणे आहे.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|
| आपटे | ९०/३ | 0.१४.00 |
| आपटे | ९०/५ | 0.0७.00 |
| आपटे | ९७ | 0.0६.00 |
| डेरवली | ११४/२ | 0.१0.६0 |

-: संपर्क :-

अंकुर श्रीवास्तव : मो.क्रं.९00४0९१९१४/९३२२0७१९१४


# गरजवंतांना चंदी भाईंचा मदतीचा हात : मीरा फाऊंडेशनचा पुढाकार



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील मीरा फाउंडेशनच्या माध्यमातून येथील निराधार, विधवा, अपंग यांना दर महिन्याला एकहजार रुपयांची पेन्शन स्वरूपात रक्कम दिली जात असून हा मदतीचा हात मागील पाच महिन्यांपासून अविरतपणे सुरू आहे.शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी ( चंदी भाई ) आणि त्यांच्या पत्नी रेखा चौधरी यांनी सुरू केलेली ही सेवाभावी भूमिका निस्वा-र्थीपणे सढळ हस्ते मदत करीत आहेत. दर महिन्याला जवळपास १५० गरजवंतांना याचा लाभ मिळत आहे.

२०१६ च्या नगरपरिषदेच्या निवडणूक काळात सत्ता स्थापन करण्यासाठी शिवसेनेने आपल्या जाहीरनाम्यात मतदारांना आश्वासन दिले होते.सत्ता स्थापन झाल्यावर आपल्या सर्व विश्वासू लोकप्रतिनिधींच्या हातात सत्तेच्या चाव्या सुपूर्द केल्या होत्या.सत्तेतून चंदी भाई यांनी कुठल्याही प्रकारचा लाभ घेतला नाही.त्यांनी समाजसेवेवर अधिक भर दिल्यामुळे सत्तेचा उपभोग आपल्या सर्व लोकप्रतिनिधींकडे स्वाधीन केला होता.सत्तेचा पाच वर्षांचा कार्यकाळ संपुष्टात येत असताना त्यावेळेस जाहीरनाम्यात नमूद केल्याप्रमाणे निराधार,विधवा, अपंगांना दर महिन्याला एकहजार रुपयांची पेन्शन देण्याचे ठरले असताना त्याबाबत कुणीही पुढाकार घेत नाही हे पाहून चंदी भाई यांनी शिवसेना शाखेत १६ डिसेंबर २०२१ पासून ही पेन्शन योजना सुरू केली आहे त्यामुळे त्यांची शब्दाला जागणारा नेता अशीच ओळख निर्माण झाली आहे.आज देखील शिवसेना शाखेत ह्या पेन्शन योजनेचा लाभ अनेक गरजवंतांनी घेतला आणि मनोमन समाधान व्यक्त केले सर्व लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद यानिमित्ताने दिसुन आला. ज्यांच्या घरची परिस्थिती खूपच हलाखीची आहे त्यांना औषधे वगैरे खर्चासाठी या पैशाचा उपयोग होत आहे. या कार्यक्रमावेळी शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी, उप शहरप्रमुख प्रमोदशेठ नायक, माजी नगरसेवक संदिप शिंदे, प्रकाश सुतार,अनिस शेख, खालिद शेख, युवा सेनेचे निखिल शिंदे, गौरंग वाघेला, शैलेश वाघेला, नरेश परदेशी, संतोष खाड़े, प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले,किशोर धनावडे,मीरा फाउंडेशनच्या संचालिका रेखा चौधरी ,महिला संघटिका संगीता जांभळे, शलाका शेलार,युवती सेनेच्या अंकिता तोरणे,अर्चना बिरामणे, सागरिका कदम,अंकिता तोरणे,निधी जाधव, जोती बिरामणे, माधुरी बिरामणे, मेघा कोतवाल,संध्या पार्टे यांसह अन्य कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

सरकारी पेन्शन योजनेप्रमाणे तुम्ही ही योजना न चुकता स्वतः ची पदरमोड करून केवळ शिवसेनेच्या जाहीरनाम्यात जनतेला दिलेलं वचन पूर्ण करण्यासाठी करत आहात हे शिवसेना पक्षाच्या प्रामाणिकतेसाठी उत्तम उदाहरण आहे. आई तुळजाभवानी आपणास हे कार्य असेच पुढे पूर्णत्वास नेण्यात बळ देवो मनःपूर्वक अभिनंदन ! वेळप्रसंगी आम्ही देखील या मध्ये खारीचा वाटा निश्चितच उचलू

**योगेश जाधव, अध्यक्ष**
**वन संरक्षक समिती माथेरान**

माथेरान मधील धनाढ्य लोकांनी,राजकारण्यांनी सुध्दा येथील निराधार, विधवा, अपंग यांना वेगवेगळ्या पद्धतीने मदतीचा हात दिल्यास गरजवंतांना आधार मिळू शकतो.चंदी भाई चौधरी यांच्या प्रमाणे दातृत्व करण्याची गरज आहे. सर्वच राजकीय पक्षांनी अशाप्रकारे इथल्या सर्वांनाच नियमितपणे मदत केल्यास उमेदवारांना निवडणुकीत खर्च करण्याची आवश्यकता भासणार नाही.

**प्रकाश सुतार,**
**माजी नगरसेवक माथेरान**

# वाघेश्वरी देवस्थानला पर्यटक दर्जा मिळण्यासाठी आवश्यक सेवासुविधांची पूर्तता करणार : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्याचे अगदीच सीमेवर निसर्गाच्या कुशीत वसलेल्या धनगरमलई हमरस्त्यालगत तोंडसुरे पंचक्रोशीचे जागृत देवस्थान अशी ओळख असलेल्या पुरातन वाघेश्वरी देवता मंदिराला पर्यटणीय दर्जा मिळवून देण्यासाठी आम्ही यशस्वी प्रयत्न करू असे अभिवचन महाराष्ट्र राज्य मंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांनी वाघेश्वरी देवता नवीन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना सांगितले.

मौजे तोंडसुरे, पेडांबे, जंगमवाडी आणि वरवठणे या चार गावाचे ग्रामदैवत असलेली वाघेश्वरी देवता मंदिर हे येथील मागील चार पिढ्याचे श्रद्धास्थान आहे येथे आवश्यक असणारी वीज, पाणी, रस्ता आदी पर्यटणीय सेवासुविधा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक तेवढ्या शासकीय निधीची मंजुरी देण्यात येईल असेही पालकमंत्री आदिती तटकरे यांनी ग्रामस्थांना आश्वासीत करताना सांगितले.

या वेळी पालकमंत्री आदिती तटकरे यांचे समावेत तालुका अध्यक्ष समीर बनकर, राजीप माजी सभापती बबन मनवे, माजी सभापती छाया म्हात्रे, माजी उपसभापती संदीप चाचले, पं.स.सदस्य मधुकर गायकर, गण अध्यक्ष सतीश शिगवण, सरपंच स्मिता जंगम, उपसरपंच उमेश नाक्ती, सरपंच इशरत फकिह, चार गाव अध्यक्ष भिकु पाटील, उपाध्यक्ष तुकाराम अधिकारी, मनोज नाक्ती, अनिल जंगम, मोरेश्वर जंगम, गजानन जंगम, सुधाकर जंगम, रामलिंग जंगम, सुरेश पाटील, मालिकांत जंगम, जगदीश लोनशिकर, अशोक काजारे, प्रकाश गाणेकर, रामचंद्र शिंदे, सागर जाधव आदी मान्यवर, पंचक्रोशी ग्रामस्थ, महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.